ePaper

## ‘छत्रपतींचा अवमान करणारे राज्यपाल पंतप्रधानांसोबत कसे?’; उद्धव ठाकरे



| वर्ष - 6 | अंक - 238 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | |सोमवार |दिनांक 12 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- आपली विचारसरणी जीवनाची स्थिती आणि दशा ठरवते!
- “रनिंग ॲबिलिटी ऑफ बुल्स रिपोर्ट” निर्णायक ठरेल!
- “आपणही होता अडीच वर्षे, काय केलं सीमाप्रश्नाचं?

# शिंदे-फडणवीसांचे स्थगिती सरकार!

## अजित पवार यांची टीका : राष्ट्रवादीचे कार्यकर्ता प्रबोधन शिबिर

|पिंपरी |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|



**“शिंदे-फडणवीस सरकारचं राज्यात लक्ष नाही, ग्रामीण भागामध्ये लंपी म्हणून आलेला आजार तिथही यांचं लक्ष नाही, हजारो जनावरं मेली, त्यावरही यांचं लक्ष नाही,” अशी टीका राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली. ते पिंपरी-चिंचवडमध्ये आयोजित राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ता प्रबोधन शिबीरात बोलत होते.**

ते पुढे म्हणाले, “राज्यात गोवरची खूप मोठी साद आलेली आहे, त्यावरही हे सरकार लक्ष द्यायला तयार नाही, हे प्रकरण गांभीर्याने घ्यायला तयार नाही, कोरोनासारख्या बिकट परिस्थितीत, मी जेव्हा पालकमंत्री होतो, त्यावेळेस पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्ये सकाळी ७ वाजता हजर राहून सर्व परिस्थितीचा आढावा घेत होतो. तसेच जिथे गरज आहे, तेथे गरज पोचविण्याचे कार्य तत्परतेने आम्ही करत होतो, परंतु आत्ताचे सरकार हे खोके सरकार आहे. हे स्थगिती सरकार आहे, हे महापुरुषांबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्यांना पाठीशी घालणारे सरकार आहे,” अशी टीका ही यावेळी अजित पवारांनी केली.

“आत्ताचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपले ४० आमदार सांभाळण्यातच वेळ घालवीत आहेत, राज्यात ग्रामीण भागात जनावरांना लंपी रोग झाला आहे, या आजाराने अनेक गाई मरण पावले आहेत. तसेच लहान मुलांना गोवर या आजाराचे प्रमाण वाढत आहे, परंतु या आजारांना आळा घालण्यासाठी सरकार ठोस पावले उचलताना दिसत नाही.” असे ही यावेळी अजित पवार म्हणाले.

### गुजरातला फॉक्सकॉन अन् महाराष्ट्राला पॉपकॉर्न : भुजबळ

**“आज महाराष्ट्रात येऊन हजार कोटींचा प्रकल्प देऊ सांगत आहेत, म्हणजे तुम्हाला अडीच लाख कोटींचा फॉक्सकॉन आणि आम्हाला पॉपकॉर्न द्या”, अशी खोचक टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केंद्रातील मोदी सरकारवर केली आहे. जामीन मिळू नये म्हणून ईडी लावायची आणि लोकांना अडकून ठेवायचं. ईडीचा धाक दाखवून कुटुंब उद्धवस्त करायची, एवढंच काम सध्या देशात सुरू आहे, अशी टीका छगन भुजबळ यांनी केंद्रातील मोदी सरकारवर केली आहे. “ईडीचा धाक दाखवून कुटुंब उद्धवस्त करण्याचं काम सध्या सुरू आहे. अनिल देशमुख आणि नवाब मलिक दोघेही आजारी आहेत. अनिल देशमुखांना ईडीच्या केसमध्ये जामीन मिळाला आहे, तरी सुद्धा त्यांना जेलमध्ये ठेवण्यात आले आहे. जामीन मिळू नये म्हणून ईडी लावायची आणि लोकांना अडकून ठेवायचं, एवढंच काम सध्या देशात सुरू आहे”, अशी टीका छगन भुजबळ यांनी केली आहे.**

# “शाईफेक” प्रकरणी आरोपींवर कारवाई करा!

## भाजपाची मागणी : पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांना निवेदन

|पिंपरी-चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|



राज्याचे उच्च, तंत्र शिक्षण मंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करीत, शाई फेकणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी भाजपा पदाधिकाऱ्यांनी केली.

याबाबत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, राहुल जाधव, आमदार उमा खापरे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, नवनगर प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सचिव अमित गोरखे, महिला शहराध्यक्ष उज्वला गावडे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, दक्षिण भारतीय आघाडीचे राजेश पिल्ले, माजी स्थायी समिती अध्यक्ष विलास मडीगेरी यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

पोलीस प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शनिवार दि. १० डिसेंबर २०२२ रोजी चिंचवडगाव येथे नियोजित कार्यक्रमासाठी पालकमंत्री मा.ना. चंद्रकांत पाटील आले असता पूर्व नियोजित कट करून काही व्यक्तींनी त्यांच्यावर केमिकल युक्त रासायनिक द्रव्य त्यांच्या जीवावर बेतेल अशा पद्धतीने टाकून त्यांच्यावर भ्याड हल्ला केला. सदर कृत्य हे काही ठरविक संघटना आणि व्यक्तींनी त्या बद्दल नियोजनबद्ध कट आणि कारस्थान करून “सोशल मीडिया”द्वारे चिथावणीखोर वक्तव्ये देऊन वातावरण कलुषित केले होते. कार्यक्रमस्थळी जमण्याचे आवाहन करून कार्यक्रमात विघ्न आणण्याचे आणि समाजात दुही पसरवण्याचा त्यांचा मुख्य उद्देश होता हे त्यांच्या “सोशल मीडिया”वरील पोस्ट मधून स्पष्ट होत आहे. मात्र, सायबर सेलने त्यावर काहीही कारवाही केली नाही. सायबर सेलच्या अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता यातून दिसून येत असून संबधित अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी.

### ... तर आंदोलन करणार!

**पोलीस प्रशासनाने योग्य वेळेस खबरदारी घेतली असती, तर अनुचित प्रकार टाळता आला असता. सदर व्यक्ती आणि “सोशल मीडिया” वरील त्यांची पेजचे व त्यांचे ॲडमिन यांवर सायबर गुन्हेगारी अंतर्गद कडक कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनात केली आहे. तसेच, सदर व्यक्तीवर पुढील २ दिवसांत कारवाही न झाल्यास मोठया प्रमाणात आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही भाजपा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.**

# पुण्यात रिक्षाचालक संघटना आक्रमक!

## आज पुन्हा करणार 'चक्काजाम'



पुणे
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

रिक्षाचालक पुन्हा एकदा चक्काजाम आंदोलन करणार आहे. त्यामुळे पुण्यातील रिक्षा वाहतूक सोमवारी बंद राहणार आहे. रिक्षा संघटनांच्या मागण्या मान्य न झाल्याने रिक्षाचालक पुन्हा एकदा संपावर जाणार असल्याचं सांगण्यात आलं आहे.

'बघतोय रिक्षावाला' या संघटनेसह अनेक रिक्षा संघटना बंदमध्ये सहभागी होणार आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये तब्बल एक लाखाहून अधिक रिक्षाचालक बंदमध्ये सहभागी होणार आहेत. 14 दिवसांचा अल्टिमेटम देऊनही प्रशासनाने मागण्या पूर्ण केल्या नाही. त्यामुळे प्रशासनाने फसवल्याचा आरोप करत रिक्षा चालक संघटना आंदोलनावर ठाम आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आदेश देऊनही अधिकाऱ्यांनी बेकायदा बाईक टॅक्सीवर कारवाई केली नाही असा आरोप संघटनांनी केल्या आहेत. उद्या सकाळी अकरा वाजता आरटीओ कार्यालयाबाहेर रिक्षा चालक चक्काजाम आंदोलन करणार आहे.

याआधी रिक्षाचालक संघटनांनी केलेल्या आंदोलनामुळे पुणेकरांचा मोठ्या प्रमाणात हाल झाले होते. तसेच खासगी वाहनचालकांनी प्रवाशांच्याकडून आणि विद्यार्थ्यांकडून अव्वाच्या सव्वा भाडे आकरले होते. त्यामुळे उद्या पुणेकरांना त्रास सहन करावा लागू शकतो.

# चंद्रकांत पाटील यांच्यावर हल्ला झाल्याने भाजप आक्रमक...

पुणे
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।



पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शाई हल्ला झाल्याने शहरातील भाजपचे पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून या प्रवृत्तीविरुद्ध आणि हल्ल्याच्या सुत्रधारांविरोधात कडक कारवाई करा अशी मागणी करण्यात आली. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा घेऊन अनेक कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते. भाजपचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक, आमदार माधुरी मिसाळ, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, आमदार भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, सुनील कांबळे, ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर, पुणे प्रभारी धीरज घाटे, गणेश बीडकर, हेमंत रासने, संघटन सरचिटणीस राजेश पांडे, सरचिटणीस गणेश घोष, राजेश येनपुरे, दीपक पोटे, दीपक नागपुरे, दत्ता खाडे, संदीप लोणकर, बापू मानकर यासह आदी उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील यांनी पैठण येथील कार्यक्रमात महापुरुषांबद्दल केलेल्या वक्तव्यावरून वाद सुरू झाला याचा. याचा निषेध म्हणू चिंचवड येथे शनिवारी एकाने पाटील यांच्या चेहऱ्यावर शाई फेकल्याची धक्कादायक घटना घडली. यानंतर भाजप आक्रमक झाला असून, कार्यकर्त्यांनी हल्लेखोरांवर व सुत्रधारावर कडक कारवाई करावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेला. विरोधीपक्षांच्या विरोधात घोषणाबाजी केली. तसेच महात्मा फुले यांचा विजय असो, बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो या घोषणा देण्यात आल्या, पाटील यांच्या समर्थनार्थही घोषणा देण्यात आल्या. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून करून या आंदोलनाचा समारोप करण्यात आला.

# पुणे रेल्वे स्थानकातून अडीच वर्षांच्या बालकाचे अपहरण

पुणे : पुणे रेल्वे स्थानकातून अडीच वर्षांच्या बालकाचे अपहरण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. लोहमार्ग पोलिसांकडून अपहरण प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.मूळचे झारखंडचे असलेले दाम्पत्य शहरात मजुरी करत आहे. शनिवारी (१० डिसेंबर) रात्री दाम्पत्य मूळगावी निघाले होते. रात्री साडेआठच्या सुमारास पुणे रेल्वे स्थानकातील फलाटावर दाम्पत्य थांबले होते. त्यांच्याबरोबर अडीच वर्षांचे बालक होते. त्या वेळी एक महिला आणि तिच्याबरोबर असलेला साथीदार तेथे आले. दाम्पत्याशी ओळख वाढवून दोघांनी गप्पा मारल्या. महिलेने तिच्याकडील खाऊ बालकाला दिला. बालकासाठी आणखी काही खाऊ आणतो, असे सांगून महिला आणि साथीदाराने दाम्पत्याकडे बतावणी केली. बालकाला बरोबर घेऊन दोघेजण तेथून खाऊ आणण्यासाठी गेले. त्यानंतर बालकाला घेऊन दोघेजण पसार झाले. बराच वेळ झाला तरी दोघेजण बालकाला घेऊन न परतल्याने दाम्पत्य घाबरले. त्यांनी लोहमार्ग पोलिसांकडे तक्रार दिली. पुणे रेल्वे स्थानक पोलीस ठाण्यात या प्रकरणी अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बालकाला घेऊन पसार झालेल्या महिला आणि साथीदाराचा शोध घेण्यात येत आहे. पोलिसांनी रेल्वे स्थानकाच्या आवारातील

# महापुरुषांच्या सन्मानासाठी बंद मध्ये सहभागी होण्याचे आवाहन!

हडपसर ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।



महापुरुषांच्या बाबत बेताल वक्तव्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी मंगळवार (ता.१३) नागरिकांनी पुणे बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन विविध शिवप्रेमी संघटनांनी केले आहे. याबाबत हडपसर मधील सर्व संघटना व सामजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांची बैठक येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील जिम्नेशन हॉलमध्ये आयोजित केली होती. त्यावेळी हे आवाहन करण्यात आले. आमदार चेतन तुपे, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, योगेश ससाणे, महेश टिळे, संदीप लहाने पाटील, उत्तम कामठे, विठ्ठल सातव, फारुख इनामदार, महेंद्र बनकर, साधना शिंदे, विद्या होडे, डॉ. शंतनू जगदाळे, दिलीप गायकवाड, संजय शिंदे, तुकाराम शिंदे, विवेक तुपे व महाविकास आघाडी व हडपसर भाजी मंडई व्यापारी मंडळाचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

आमदार तुपे पाटील म्हणाले, "श्रद्धा असेल तर बेताल वक्तव्य मुखातून बाहेर पडतेच कसे, काही घटकांकडून महापुरुषांची बदनामी करणारे प्रशिक्षण साडेतीनशे वर्षापासून आजतागायत दिले जात आहे. ते रोखण्यासाठी व महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी तसेच एक दिवस महापुरुषांच्या सन्मानासाठी नागरिकांनी बंद मध्ये सहभागी व्हावे.' या बंदच्या निमित्ताने अशा प्रवृत्तींचा निषेध करण्यासाठी हडपसर कॉंग्रेस पक्षाच्या वतीने हडपसर वानवडी परिसरात दुचाकी रॅली काढण्यात येणार असल्याचे माजी मंत्री शिवरकर यांनी सांगितले.

# "शाईफेक" मुळे पिंपरी-चिंचवडला गालबोट!

## आमदार महेश लांडगे यांची टीका : पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे तीव्र निदर्शने

पिंपरी ।
।महाईन्यूज ।

ज्याचे उच्च, तंत्र शिक्षणमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर भ्याड हल्ला करण्यात आला. संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीवर अशाप्रकारे रसायनमिश्रित द्रव्य फेकणे पिंपरी-चिंचवडच्या सुसंस्कृत लौकिकाला गालबोट लावण्याचा प्रकार आहे. सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवृत्तीवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी टीका भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली.




राज्याचे मंत्री आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शनिवारी चिंचवडमध्ये शाई फेकून भ्याड हल्ला करण्यात आला. याच्या निषेधार्थ शहर भाजपाच्या वतीने रविवारी मोरवाडी येथे आंदोलन करण्यात आले.

यावेळी शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, राहुल जाधव, आमदार उमा खापरे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, नवनगर प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सचिव अमित गोरखे, महिला शहराध्यक्ष उज्ज्वला गावडे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, दक्षिण भारतीय आघाडीचे राजेश पिल्ले, माजी स्थायी समिती अध्यक्ष विलास मडीगेरी, भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष संकेत चोंधे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार उमा खापरे म्हणाल्या की, चंद्रकांत पाटील यांच्या अंगावर शाई फेकण्याचा प्रकार घडला असून, त्याचा आम्ही जाहिर निषेध करतो. हा प्रकार अत्यंत निंदनीय असून, पाटील यांच्या विधानाचा चुकीचा अर्थ लावून, लोकांना भडकविण्याचे प्रकार घडवून आणणे, हे अत्यंत दुर्भाग्यपूर्ण आहे. या घटनेतील आरोपींची सखोल चौकशी होऊन, यात सहभागी लोकांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणीही खापरे यांनी केली आहे.*

### सामाजिक दुही निर्माण होणारी कृत नको...

आमदार लांडगे म्हणाले की, भारतीय राज्यघटनेनुसार देशातील प्रत्येक नागरिकाला निषेध नोंदवण्याचा अधिकार दिलेला आहे. एखादी गोष्ट आपल्या भावना दुखावणारी असेल, तर त्याचा निषेध सनदशीर मार्गाने नोंदवला पाहिजे. कर्नाटकातील एका काँग्रेस नेत्याने हिंदू धर्माबाबत आक्षेपार्ह विधान केले होते. त्याचा निषेध भाजपाने सनदशीर मार्गाने केला होता. चंद्रकांत पाटील यांच्या बाबत घडलेला प्रकार हा भ्याड हल्ला होता. ही पिंपरी-चिंचवडची संस्कृती नाही. शहरामध्ये सर्व समाजाचे नागरिक गुण्यागोविंदाने राहतात. समाजातील सलोखा बिघडवण्याचा प्रकार काही लोक करीत आहेत, ही बाब सर्वच पक्षाच्या राजकीय नेत्यांनी लक्षात घेतली पाहिजे.

# चिंचवड देवस्थानला 'क' तीर्थक्षेत्र दर्जा!

## आमदार लक्ष्मण जगताप यांचा यशस्वी पाठपुरावा : पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची घोषणा

पिंपरी ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडची धार्मिक ओळख असलेल्या चिंचवडगावातील मोरया गोसावी चिंचवड देवस्थानाला "क" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा आणि मोरया गोसावी मंदिर परिसराचा तीर्थक्षेत्राप्रमाणे विकास करण्यासाठी निधी मिळावा यासाठी भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांनी राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. तसेच विधीमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात प्रश्न उपस्थित करून मोरया गोसावी मंदिर परिसराच्या विकासाकडे राज्य सरकारचे लक्ष वेधले होते.**



आता पालकमंत्री आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोरया गोसावी संजीवन समाधी महोत्सवात चिंचवड देवस्थानाला "क" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याची घोषणा केल्याने आमदार लक्ष्मण जगताप यांच्या सततच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

मोरया गोसावी महाराज यांनी चिंचवडगावातील पवना नदीकाठी संजीवन समाधी घेतली. ते १४ व्या शतकातील गाणपत्य संप्रदायातील संत होते. ते मोठे गणेशभक्त होते. मोरया गोसावी महाराज यांनी संजीवन समाधी घेतल्यानंतर त्यांचे चिरंजीव श्री चिंतामणी महाराज देव यांनी समाधीवर श्रीगणेशाची स्थापना करून मंदिराची उभारणी केली. मोरया गोसावी महाराजांची संजीवन समाधी आणि मंदिर हे संपूर्ण महाराष्ट्रातील गणेशभक्तांचे प्रमुख आकर्षण आहे. मोरया गोसावी मंदिर हे पिंपरी-चिंचवडकरांचे श्रद्धास्थान आहे.

त्यामुळे आमदार लक्ष्मण जगताप यांनी मोरया गोसावी मंदिर परिसराला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

राज्य सरकारच्या संबंधित विविध विभागाकडे पत्रव्यवहार करून श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी मंदिर, चिंचवड देवस्थान ट्रस्टला "क" वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावे, अशी मागणी आमदार लक्ष्मण जगताप यांनी केली होती.

त्याचप्रमाणे विधीमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात प्रश्न उपस्थित करून मोरया गोसावी मंदिर

### पालकमंत्र्यांचे मानले आभार...

आमदार जगताप यांच्या सततच्या या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. शनिवारी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते मोरया गोसावी संजीवन समाधी महोत्सवाचे उद्घाटन झाले. त्यावेळी त्यांनी बोलताना मोरया गोसावी मंदिर परिसराला "क" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याची घोषणा केली आहे. तसेच या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी तातडीने यावर्षीचा निधी तातडीने देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे आमदार लक्ष्मण जगताप यांनी समाधान व्यक्त केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून करत असलेल्या प्रयत्नांना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यामुळे यश आल्याचे त्यांनी सांगितले. तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यामुळे मोरया गोसावी मंदिर परिसराच्या विकासाला चालना मिळणार आहे. त्याबद्दल आमदार जगताप यांनी पालकमंत्री पाटील यांचे आभार मानले आहेत.

## संपादकीय »

### सीमेवरील बांधवांचे काय चुकले!

***कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील ४२ गावांवर दावा सांगितल्यापासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचा प्रश्न पुन्हा एकदा धगधगू लागला आहे.***

बोम्मई यांनी जतमधील गावांसोबतच सोलापूर आणि अक्कलकोटवरही कर्नाटकचा दावा सांगितला आहे. बोम्मई यांच्या वक्तव्यानंतर महाराष्ट्रातून संतप्त प्रतिक्रिया न उमटल्या तेच नवल. सीमाभागातील एकही गाव कर्नाटकात जाऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लागलीच दिली, पण सीमाभागातील ज्या पाणीप्रश्नामुळे बसवराज बोम्मईंच्या हाती आयते कोलीत मिळाले, तो प्रश्न निकाली काढणे आजचे शिंदे सरकारच काय परंतु याआधीच्या कुठल्याही आघाडी वा युतीच्या सरकारला जमले नाही, हे केवळ सीमावासीयांचे नव्हे, तर अवघ्या महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणावे लागेल.

महाराष्ट्रातील सारेच राजकीय पक्ष त्याबाबतीत अपयशी ठरलेत. जत तालुक्यातील ६५ गावांनी २०१२ मध्ये पाणीप्रश्नाच्या मुद्यावर राज्यातील तेव्हाच्या आघाडी सरकारवर संताप व्यक्त करत कर्नाटकात जाण्याचा इशारा दिला होता. साधारण दहा वर्षांपूर्वी गावकऱ्यांनी केलेल्या त्या ठरावाचे भांडवल करत बोम्मई यांनी ही गावे कर्नाटकात घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे वक्तव्य केले. त्यावरून हा वाद पेटला. एवढ्यावरच कर्नाटक सरकार थांबलेले नाही, तर काल-परवा बोम्मई सरकारने कोणतेही आवर्तन जाहीर केले नसताना तुबची बबलेश्वर योजनेतून जत तालुक्यातील काही गावांमध्ये पाणी सोडले आणि एकप्रकारे महाराष्ट्राच्या वर्मावर घाला घालण्याचे काम केले आहे. आजपर्यंत बेळगाव, निपाणी, कारवार आणि बिदरमधील ८६५ गावे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाच्या केंद्रस्थानी राहिलेली आहेत. त्यावरून सीमाभागात भाषिक बहुसंख्या, भौगोलिक सलगता, अस्मितेच्या मुद्यावर अनेकदा राजकीय लढाया लढल्या गेल्यात, असंख्य उपोषणे-आंदोलने झाली.

सध्या याप्रश्नी सर्वोच्च न्यायालयात संथगतीने का होईना, पण सुनावणीदेखील सुरू आहे, मात्र यावेळी अचानक बाहेर आलेला सीमावादाचा हा मुद्दा तांत्रिक पेचापेक्षा शहरी-ग्रामीण क्षेत्राच्या पायाभूत सुविधांमधील असमतोलपणा आणि राजकीय अकार्यक्षमतेवर नेमकेपणाने बोट ठेवणारा आहे. एका बाजूला विकासाच्या लंब्याचौड्या बाता मारायच्या आणि दुसऱ्या

# उच्च शिक्षणातील समतेचे आव्हान






देशात विद्यापीठे व महाविद्यालये मोठ्या प्रमाणात असली, तरी गुणवत्तेच्या बाबतीत फारच मोजक्या विद्यापीठांना व संस्थांना उंची गाठता आली आहे. गुणवत्ता वाढवणे हे विद्यापीठे व महाविद्यालयांपुढील आजचे सर्वांत मोठे आव्हान आहे. चांगल्या गुणवत्तेची व चांगल्या पायाभूत सुविधांची, गुणवान शिक्षक असलेली विद्यापीठे व महाविद्यालये असतील, तरच गुणवान तरुण-तरुणी घडतील. देश, समाज आणि कुटुंबांच्या प्रगतीसाठी ती योगदान देऊ शकतील. देशाचा विकास हा मनुष्यबळाच्या गुणात्मक विकासावर अवलंबून आहे, हे सरकार, समाज आणि संस्थाचालकांना समजायला हवे. आजची गुंतवणूक उद्याची कसदार पिढी व भवितव्य घडवीत असते, हे लक्षात घ्यायला हवे. शिक्षणाबाबत तशी धोरणे आखायला हवीत आणि जीडीपीच्या सहा टक्के इतकी गुंतवणूकही करायला हवी. गुणवान व कसदार मनुष्यबळ हवे असल्यास, कसहीन शिक्षण देऊन चालणार नाही, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य नाही का? बड्या, भव्यदिव्य इमारती बांधायच्या आणि गुणवत्तेचे तीनतेरा वाजवायचे, यातून काहीच साध्य होणार नाही. नव्या पिढीला किरकोळ संशोधन सुविधा, पगार, अपात्र शिक्षक, तकलादू आणि सत्त्वहीन शिक्षण देऊन अशा शिक्षणसंस्था, बघे सरकार सामाजिक व राष्ट्रीय गुन्हाच करीत आहेत. आपण देशाच्या भवितव्याशी खेळतो आहोत, याचे भान जितक्या लवकर सर्व घटकांना येईल, तितके चांगले!

भारतीय उच्च शिक्षणचा मोठा विस्तार झाला असला, तरी ते समाजातील सर्व स्तरांतील तरुणांना समानतेने मिळत नाही. तिथेही जाती व्यवस्थेसारखी उच्च-नीचतेची उतरंड आहेच. काही सरकारी व काही खासगी विद्यापीठे - संस्था चांगल्या आहेत; तिथे मोजक्यांनाच प्रवेश मिळतो. इतरांना ती संधी मिळत नाही, हे वास्तव आहे. समाजातील उच्चभ्रू व श्रीमंत वर्गास उत्तम शिक्षण आणि बाकीच्यांना कमी दर्जाचे शिक्षण, हा भेदाभेद का असावा? चांगले शिक्षण हा गोरगरीब व मध्यमवर्गीय घरातील तरुणांचा अधिकार नाही काय? आपण अजूनही उच्च शिक्षणासाठी समान संधी निर्माण करू शकलेलो नाही. खेड्यापाड्यांतील खुल्या संवर्गातील गरीब मुलेही उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत. ते उच्च शिक्षणात यावेत व टिकावेत, यासाठी सरकारने शिष्यवृत्ती सुरू करायला हवी. मुस्लिम समाजातील गरीब विद्यार्थी वर्गासही ती द्यायला हवी. सरकारने या दिशेने पावले टाकायला काय हरकत आहे?

देशातील ७८ टक्के महाविद्यालये खासगी आहेत. यातील पाच ते १० हजारांवर विद्यार्थी असणाऱ्या सक्षम संस्थाचालकांनी निवडक १०० गरीब व हुशार मुलांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीद्वारे नि:शुल्क शिक्षण दिले, तर काय बिघडणार आहे? याला मी एज्युकेशनल सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (ईएसआर) असे म्हणतो. देशातील त्या त्या राज्यांतील सर्वच उद्योगपतींनी गरीब व हुशार मुलांसाठी शिष्यवृत्ती द्यावी. आजच्या काळात सक्षमांनी अक्षमांना आधार देणे, ही खरी देशभक्ती ठरेल. देशभक्तीचे सार्वजनिक प्रदर्शन करण्यापेक्षा हे नक्कीच योग्य ठरेल. उच्च शिक्षण हे मानवाच्या उत्थानाचे माध्यम आहे. मानवाच्या सुप्त क्षमतांचा विकास करण्यासाठी आणि त्यांचा समाजहितासाठी उपयोग करण्यासाठी उच्च शिक्षणासारखे अन्य माध्यम नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा उच्च शिक्षण क्षेत्रात अवधी २० विद्यापीठे, ५०० महाविद्यालये आणि एक लाख विद्यार्थी उच्च शिक्षण घेत होते. गेल्या ७५ वर्षांत विद्यापीठांची संख्या १०४३, तर महाविद्यालयांची संख्या ३९,९३१वर पोहोचली आहे.

## वृद्धांची संख्या वाढते आहे, 'वृद्धमित्र' कधी वाढणार?

**साधारण ६०-६५ वर्षे वयापुढचा काळ हा वृद्धावस्था म्हणून गणला जातो. शरीराची कार्यक्षमता आणि इजा किंवा झीज भरून काढण्याची क्षमता कमी होऊ लागते तेव्हा जरण सुरू होते आणि वाढत्या वयाची लक्षणे दिसू लागतात.**



भारतातील वाढत्या लोकसंख्येनुसार वृद्धांची संख्या लक्षात घेता २००१ साली सुमारे १०२ कोटी ८८ लाख लोकसंख्येपैकी ७ कोटी १० लाख व्यक्ती वृद्धावस्थेत होत्या, तर २०५० सालाच्या सुमारास हीच संख्या ३२ कोटी, म्हणजे त्या वेळच्या अपेक्षित लोकसंख्येच्या (१५३ कोटी) जवळजवळ २१ टक्के असेल. कुटुंबनियोजन, आरोग्यविषयक सुधारणा आणि दीर्घकालीन रोगांवर नियंत्रण यामुळे अपेक्षित आयुर्मान जसे उंचावेल, तसे एकूण वृद्धांचे प्रमाण वाढतच जाईल.

वृद्धावस्थेकडे सामाजिकदृष्ट्या तसेच वैद्यकीयदृष्ट्या निराळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. वयाची साठी ओलांडली की, आरोग्याचे प्रश्न तुलनेने कमी होतात, पण निवृत्तीनंतर कौटुंबिक, आर्थिक प्रश्न उभे ठाकतात. साधारण सत्तरीपुढील वयात उमेद कमी होऊ लागते, शारीरिक प्रश्न वाढू लागतात, व्याधी वाढून कदाचित संपूर्ण परावलंबित्व आलेले असू शकते. या सर्व वयोगटांमध्ये स्वभावातील बदल, एकटेपण व त्यामुळे मानसिक आणि भावनिक प्रश्नही डोके वर काढू लागतात.

ज्येष्ठांसोबत काम सुरू केले तेव्हा या उपक्रमाचे नाव काय ठेवावे, यावर बरीच चर्चा झाली. त्यांच्यामध्ये काम करताना लक्षात आले की, वृद्धांना आमच्यात एक मित्र सापडतो. तिथून 'वृद्धमित्र' ही संकल्पना पुढे आली. पुण्यातील दोन वस्त्यांपासून वृद्धमित्रांचे काम सुरू झाले. त्यानंतर पुणे महानगरपालिकेसमोर, या प्रकल्पासंदर्भातील सादरीकरण करण्यात आले. महानगरपालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली. कोविडकाळात वृद्धमित्रांचे काम पुण्यातील इतर वस्त्यांमध्येही सुरू करण्यासंदर्भात महानगरपालिकेने पत्र काढले आणि परवानगी दिली. दळवी रुग्णालय आणि सोनवणे रुग्णालयात 'जेरियाट्रिक युनिट' सुरू करण्यासाठी जागा दिली. आता या दोन्ही रुग्णालयांत वृद्धांना विनामूल्य फिजिओथेरपी दिली जाते. समाजाकडून, कुटुंबाकडून दुर्लक्षित वृद्धांच्या शारीरिक, मानसिक आणि कौटुंबिक गरजा ओळखून त्यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारणे, हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. काही वृद्ध घरी एकटेच राहतात. त्यांच्याशी बोलायला कोणीच नसते. त्यांना बाहेर फिरून यावेसे वाटले, तरी सोबत कोणीही नसल्यामुळे ते एकटे बाहेर पडू शकत नाहीत. अशा परिस्थितीत वृद्धमित्र अपेक्षित सर्व मदत करतात, आधार देतात. त्यांना एकटेपणा वाटणार नाही याची काळजी घेतात. बाहेर फिरवून आणणे, त्यांच्याशी त्यांना आवडेल अशा विषयावर गप्पा मारणे असे शक्य ते सर्व प्रयत्न करतात. वृद्धमित्र कार्यक्रमांतर्गत वृद्धांसोबत काम सुरू करताना त्यांच्या प्राथमिक गरजा आणि राहणीमान समजून घेताना काही माहिती गोळा केली असता आतापर्यंत ६३ टक्के महिला आणि ३७ टक्के पुरुष आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# “समृद्धी महामार्ग विदर्भ-मराठवाड्यासाठी वरदान ठरेल”

## नितीन गडकरींचे प्रतिपादन

। नागपूर । महाईन्यूज ।

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या शिर्डीपर्यंतच्या ५२० किलोमीटर टप्प्याचे लोकार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राज्यपाल भगतिसिंग कौश्यारी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. दरम्यान, यावेळी आयोजित कार्यक्रमात बोलताना समृद्धी महामार्ग विदर्भ-मराठवाड्यासाठी वरदान ठरेल, अशी प्रतिक्रिया केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. तसेच त्यांनी पंतप्रधान मोदी



आणि एमएसआरडीसीचेही आभार मानले.

“बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग आपल्या विदर्भ आणि मराठवाड्याच्या विकासासाठी आवश्यक आहे. मला आनंद आहे की, मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीसांनी या महामार्गाची कल्पना मांडली. एकनाथ शिंदे त्यावेळी मंत्री होते. त्यांनी या महामर्गाची जबाबदारी स्वीकारली आणि आज मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वात या महामार्गाचे काम पूर्ण झाले आहे. हा महामार्ग विदर्भ आणि मराठवाड्यासाठी वरदान ठरणार आहे”, अशी प्रतिक्रिया नितीन गडकरी यांनी दिली.

“एमएसआरडीसीबरोबर माझं भावनिक नातं”

“एमएसआरडीसीबरोबर माझं एक भावनिक नातं राहिलेलं आहे. मी मंत्री असताना मुंबईत ५५ उड्डाण पूल आणि देशातला पहिला मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे एमएसआरडीसीनेच बनवला होता. आज एमएसआरडीसीने हा समृद्धी महामार्गही बनवला आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. हा महामार्ग तयार करताना तलाव, नदी आणि नाले सुद्धा तयार करण्यात आले आहेत. विविध प्रकारच्या जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. यासाठी सुद्धा मी एमएसआरडीसीचे आभार मानतो”, असेही ते म्हणाले.

### “नागपूर-पुणे अंतर केवळ 6 तासांत पूर्ण होईल”

“या महामार्गाला जोडून आम्ही औरंगाबाद ते पुणेदरम्यान महामार्ग बनवणार आहोत. लवकरच या कामाची सुरुवात होईल. या महामार्गामुळे नागपूर ते पुणे अंतर केवळ ६ तासांत पूर्ण होईल. याचबरोबर आम्ही सुरत चेन्नई, इंदौर-हैदराबाद, हैदराबाद-रायपूर, नागपूर-विजयवाडा आणि पुणे-बंगळूरू असे आणखी सहा महामार्ग बनवणार आहोत. हे महामार्ग महाराष्ट्रातून जाणार आहेत”, अशी माहिती त्यांनी दिली.

### पंतप्रधान मोदींचे मानले आभार


“नागपूर एम्समुळे विदर्भ, मराठवाडा आणि छत्तीसगडच्या नागरिकांना उत्तम वैद्यकीय व्यवस्था मिळणार आहे. याचबरोबर आयआयएम नागपूरमध्ये स्थापन करण्यात आले आहे. त्याची इमारत बघण्यासाठी देशभरातील लोकं येत आहेत. हे दोन्ही प्रकल्प नागपूरमध्ये देऊन पंतप्रधान मोदींनी आपल्यासाठी मोलाचे काम केलं आहे, यासाठी मी त्यांना धन्यवाद देतो”, असेही ते म्हणाले.

---

# 'मुंबई-पुणे एक्सप्रेसवे'वर सहलीच्या बसला अपघात, दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू

। मुंबई । महाईन्यूज ।

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर बोरघाटात सहलीच्या खासगी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. मुंबईतील चेंबूरमधून ही सहल मावळमधील एका रिसॉर्टवर पिकनीकसाठी गेली होती. सहलीहून परतताना बसला अपघात झाला. एका खासगी कोचिंग क्लासेसची ही पिकनीक मावळमधील एका रिसॉर्टवर गेली होती. मात्र परतत असताना बोरघाटातील एका वळणावर बस पलटी झाले. त्यामुळे बसमधील



सर्वच विद्यार्थी जखमी झाले आहे. अपघातातील १४ जखमी विद्यार्थ्यांना खोपोलीच्या खासगी आणि सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर एक विद्यार्थी आणि एका विद्यार्थीनीचा या अपघातात मृत्यू झाला.या अपघातानंतर विद्यार्थ्यांच्या पालकांनी खोपोली येथील रुग्णालयात गर्दी केली होती.

---

# “शिंदे सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?”

## निर्भया पथकातील वाहनांवरून मनिषा कायंदेंची जोरदार टीका

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज ।

निर्भया पथकासाठी खरेदी करण्यात आलेली वाहने शिंदे गटातील आमदारांच्या सुरक्षेसाठी वापरली जात असल्याची माहिती समोर आहे. या मुद्द्यावरून विरोधकांकडून शिंदे सरकारवर टीका करण्यात येत आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या मनिषा कायंदे यांनीही शिंदे सरकारला लक्ष केलं आहे. शिंदे सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का? असा थेट प्रश्न त्यांनी विचारला आहे. प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून



त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. उद्धव ठाकरे सरकारने राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी नेमलेली निर्भया पथके सध्या गायब आहेत. महिला सुरक्षा वाऱ्यावर असून शिंदे गटाच्या फुटीर आमदारांच्या दिमतीला ही निर्भया पथके तैनात करण्यात आली आहेत. महिलांची सुरक्षा काढून घेऊन ती आमदारांवर पाळत ठेवण्यासाठी वापरणाऱ्या शिंदे सरकारचा निषेध कराव तेवढा कमी आहे”, अशी टीका मनिषा कायंदे यांनी केली आहे. “या सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?” असा थेट प्रश्नही त्यांनी विचारला आहे.

“जनता आपल्या बाजुने असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे करतात. मग आमदारांना नेमकी भीती कशाची आहे? प्रत्येक आमदार आणि खासदारांच्या दिमतीला पाच पोलिसांची वाय प्लस दर्जाची सुरक्षा तैनात करण्यात आली आहे. आपल्या माता-भगिनींची सुरक्षा काढून घेऊन ते स्वतः वापरत आहेत. हे मावळे इतके घाबरट आहेत का?” असेही ते म्हणाले.

“केंद्रातील तत्कालीन यूपीए सरकारने महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि महिला अत्याचाराचे गुन्हे रोखण्यासाठी निर्भया निधी तयार केला होता. उद्धव ठाकरे सरकारने राज्यात महिलांच्या दिमतीला निर्भया पथके देऊन त्यांचे जीवनमान सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, शिंदे सरकारने फुटीर आमदारांच्या संरक्षणासाठी आणि त्यांच्यावर पाळत ठेवण्यासाठी निर्भया वाहनांचा वापर सुरू केला आहे. तुमच्यासारखेच आता तुमच्या गटात आलेले आमदार गुवाहाटी किंवा इतरत्र पळून जायची भीती वाटत आहे का?, असा खोचक टोलाही त्यांनी लगावला.

---

# गुरव समाजासाठी राज्यात संत काशीबा युवा विकास महामंडळ

## गुरव समाजाच्या अधिवेशनात मुख्यमंत्र्यांची घोषणा

। सोलापूर । महाईन्यूज ।

शतकानुशतके देव, देश, धर्माचे रक्षण करून संस्कृती आणि परंपरा जोपासणा-या गुरव समाजाच्या सर्वांगीण आर्थिक विकासासाठी याच गुरव समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या संत काशीबा यांच्या नावाने युवा आर्थिक महामंडळ स्थापन करून त्यासाठी सुरूवातीला ५० कोटींची तरतूद करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

सोलापुरात रविवारी गुरव समाजाच्या राज्यस्तरीय अधिवेशन मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी संत काशीबा युवा विकास महामंडळाची घोषणा केली. या योजनेचा भविष्यात विस्तार करण्याची ग्वाही त्यांनी दिली. विजापूर रस्त्यावर नेहरू नगरच्या शासकीय मैदानावर झालेल्या या अधिवेशनाचे आयोजन राष्ट्रीय गुरव समाज महासंघाने केले होते. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, सोलापूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह सोलापूरचे खासदार डॉ. जयसिध्देश्वर महास्वामीजी, माजी मंत्री सुभाष देशमुख, विजय देशमुख, राणा जगजितसिंह पाटील, सचिन कल्याणशेट्टी, ॲड. शहाजीबापू पाटील, राजेंद्र राऊत, समाधान अवताडे, ज्ञानराज चौगुले आदी आमदार उपस्थित होते. गुरव समाज महासंघाचे अध्यक्ष विजयराज शिंदे यांनी स्वागत व प्रास्तविक केले. आपले सरकार संपूर्णपणे सर्वसामान्य, गोरगरीब, शेतकरी, कष्टकरी, दीनदुबळ्यांचे आहे. गेल्या पाच महिन्यात त्याची प्रचिती सर्वांना आल्याचा दावा करीत मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, लोकांच्या मनातल्या या सरकारला गुरव समाजाच्या प्रश्नांची जाण आहे. म्हणूनच या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारचे पाऊल सातत्याने पडत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शिवतत्वांनी निर्मिती झालेला गुरव समाज दधिची ऋषींपासून वारकरी सांप्रदायातील संत काशीबापर्यंत नाते सांगणारा आहे. पिढ्यानपिढ्या मंदिरे सांभाळून ईश्वराची सेवा आणि लोकप्रबोधन करणाऱ्या गुरव समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची संधी आपल्या सरकारला मिळाली आहे. या समाजाच्या उत्पन्नाची साधने पुन्हा मिळवून देण्यासाठी आपले सरकार कटिबध्द असल्याची ग्वाही त्यांनी दिली.सुशीलकुमार शिंदे यांनी गुरव समाज स्वाभिमानाने जगणारा आणि खेड्यातील देवाची सेवा करणारा गुरव समाज आर्थिक विवंचनेत राहिला तर देवापुढे नैवेद्य कोण खाणार ? या समाजाला विकासरूपी नैवेद्य आमच्या सत्ताकाळातही मिळाला नाही. किमान आता तरी मिळायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी राधाकृष्ण विखे-पाटील यांचेही भाषण झाले.

# मोदींच्या हस्ते समृद्धी महामार्ग लोकार्पण!

## वंदे भारत एक्सप्रेस अन् एम्स नागपूरचं लोकार्पण

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज महाराष्ट्राच्या समृद्धीची भाग्यरेषा असलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे लोकार्पण झाले आहे. यावेळी पंतप्रधान मोदींसह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. पंतप्रधान मोदींचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी खुद्द मोदींनीही ढोल वाजवण्याचा मोह आवरता आला नाही. मोदींनी यावेळी ढोल वाजवण्याचा आनंद घेतला.**




समृद्धी महामार्ग किंवा नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्स्प्रेस वे प्रकल्प हे पंतप्रधानांचे देशभरातील उत्तम कनेक्टिव्हिटी आणि पायाभूत सुविधांच्या व्हिजनला साकार करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. सुमारे 55,000 कोटी रुपये खर्चून 701 किलोमीटरचा हा एक्स्प्रेस वे बांधला जात आहे.

समृद्धी महामार्ग हा भारतातील सर्वात लांब एक्स्प्रेस मार्गांपैकी एक आहे, जो महाराष्ट्रातील 10 जिल्ह्यांमधून आणि अमरावती, औरंगाबाद आणि नाशिक या प्रमुख शहरी भागांमधून जातो. समृद्धी महामार्ग महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी गेम चेंजर ठरेल. हा एक्स्प्रेस वे आसपासच्या इतर 14 जिल्ह्यांचा संपर्क सुधारण्यास मदत करेल, असे पीएमओने एका निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या प्रदेशांसह राज्यातील सुमारे 24 जिल्ह्यांचा विकास होण्यास मदत होईल.

पंतप्रधान गति शक्ती अंतर्गत पायाभूत सुविधा कनेक्टिव्हिटी प्रकल्पांच्या एकात्मिक नियोजन आणि समन्वित अंमलबजावणीच्या पंतप्रधानांच्या दृष्टीकोनाला पाठिंबा देत, समृद्धी महामार्ग दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट आणि अजिंठा एलोरा लेणी, शिर्डी, वेरूळ, लोणार इत्यादी पर्यटन स्थळांना जोडला जाणार आहे.

पंतप्रधानांनी 'नागपूर मेट्रोचा पहिला टप्पा' राष्ट्राला समर्पित केला. खापरी मेट्रो स्टेशनवर त्यांनी खापरी ते ऑटोमोटिव्ह स्क्वेअर (ऑरेंज लाइन) आणि प्रजापती नगर ते लोकमान्य नगर (एक्वा लाइन) या दोन मेट्रो ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. यानंतर पंतप्रधान मोदींनी नागपूर मेट्रोने फ्रीडम पार्क ते खापरी असा प्रवास केला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

नागपूर मेट्रोच्या फ्रीडम पार्क स्टेशनवर पंतप्रधानांनी तिकीट खरेदी केले.नागपूर मेट्रोचा पहिला टप्पा 8650 कोटी रुपये खर्चून विकसित करण्यात आला आहे. 6,700 कोटी रुपये खर्चून विकसित करण्यात येणाऱ्या नागपूर मेट्रो फेज-2 ची पायाभरणीही पंतप्रधानांनी केली.

### नागपूर मेट्रोच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन

**दरम्यान मोदींनी नागपूर दाखल होत सर्वप्रथम वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनला हिरवा कंदील दाखवला आहे. ही ट्रेन नागपूर ते बिलासपूर दरम्यान धावणार आहे. यादरम्यान सुमारे 590 कोटी रुपये आणि 360 कोटी रुपये खर्चून पुनर्विकास करण्यात येणाऱ्या नागपूर रेल्वे स्थानक आणि अजनी रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाची पायाभरणीही पंतप्रधानांनी केली.**

### एम्स नागपूरचे उद्घाटन

**आता पंतप्रधान मोदींच्या हस्ते एम्स नागपूरचे उद्घाटन झाले आहे. नागपूर एम्समुळे देशभरातील आरोग्य पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या पंतप्रधानांच्या वचनबद्धतेला आणखी बळ मिळेल. जुलै 2017 मध्ये पंतप्रधानांनी ज्या हॉस्पिटलची पायाभरणीही केली होती, ते केंद्रीय क्षेत्र योजना प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत उभारण्यात आले आहे.**

---

## गुजरातमध्ये आम आदमी पार्टीने 'खेळ' बिघडवला"

### काँग्रेसच्या पराजयावर पी चिदंबरम यांचं वक्तव्य

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**गुजरात आणि हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आहे. गुजरातमध्ये काँग्रेसने अत्यंत खराब कामगिरी केली आहे, पण हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसने भाजपाकडून सत्ता हिसकावून घेतली आहे. निवडणुकीआधी गुजरात आणि हिमाचल प्रदेश ही दोन्ही राज्ये भाजपाच्या ताब्यात होती. पण हिमाचल प्रदेशात सत्तांतर घडवण्यात काँग्रेस यशस्वी ठरली आहे.**




गुजरातमधील काँग्रेसच्या पराजयानंतर काँग्रेस नेते पी चिदंबरम यांनी 'पीटीआय'शी संवाद साधला. यावेळी चिदंबरम म्हणाले, "गुजरात, हिमाचल प्रदेश आणि दिल्ली महानगरपालिकेत भाजपाची सत्ता होती. या तीनपैकी दोन ठिकाणी भाजपाला मोठा धक्का बसला आहे. गुजरातमध्ये आम आदमी पक्षाने (आप) खेळ बिघडवला आहे. 'आप'ने यापूर्वी गोवा आणि उत्तराखंडमध्येही असंच केलं होतं," असं चिदंबरम म्हणाले. उत्तराखंड आणि गोव्याप्रमाणेच गुजरातमध्येही 'आप'ने खेळ बिघडवला आहे. दिल्ली वगळता इतर ठिकाणी 'आप'मुळे काँग्रेसला नुकसान होतं. पी चिदंबरम म्हणाले की, २०२४च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या दृष्टीने जनमत गोळा करण्यासाठी काँग्रेस सर्वोत्तम स्थितीत आहे. त्यामुळे देशात अनेक ठिकाणी बिगर-भाजपा आघाडी तयार केली जाऊ शकते. गुजरातमध्ये झालेल्या पराभवातून काँग्रेसने काहीतरी शिकलं पाहिजे, असं चिदंबरम यांनी नमूद केलं.

चिदंबरम पुढे म्हणाले, "तीनपैकी दोन ठिकाणी भाजपाला पराभवाचा सामना करावा लागला, हा भाजपासाठी मोठा धक्का आहे. गुजरातमधील विजय महत्त्वाचा आहेच, पण हिमाचल प्रदेश आणि दिल्ली महापालिकेमध्ये सत्ताधारी भाजपाला निर्णायक पराभव पत्करावा लागला, हे वास्तव लपवता येणार नाही."

## कर्नाटकचे मुख्यमंत्री माज आल्यासारखे बोलतात; उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

कर्नाटकचे मुख्यमंत्री अतिशय मस्तीत किंवा माज आल्यासारखे बोलत आहेत. काल त्यांनी कहर केला. सध्या महाराष्ट्र-कर्नाटक वाद पेटलेला असताना महाराष्ट्राच्या बाजूने कोणीच बोलत नाही आहे, अशा शब्दांत ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्यावर हल्लाबोल केला. दिवसेंदिवस महाराष्ट्र-कर्नाटक वाद चिघळत आहे. महाराष्ट्राच्या वाहनांवर कर्नाटकात हल्ला करण्यात आला. या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर बोलताना आज उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारला फटकारले.



ठाण्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी आज उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावरून राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारवर हल्लाबोल केला. "सध्या महाराष्ट्र-कर्नाटक वाद पेटलेला असताना महाराष्ट्राच्या बाजूने कोणीच बोलत नाही. कर्नाटकचे मुख्यमंत्री अतिशय मस्तीत किंवा माज आल्यासारखे बोलत आहेत. काल त्यांनी कहर केला. पण आमचे मुख्यमंत्री त्यांना जेवढे लिहून दिले जाते तेवढंच ते वाचतात"

पुढे उद्धव ठाकरे म्हणाले की, "महाराष्ट्र-कर्नाटक वाद सर्वोच्च न्यायालयात आहे. पण महाराष्ट्र जसा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची वाट पाहतोय, तशी वाट कर्नाटकानेही बघणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण असताना ते जर बेळगावला उपराजधानीचा दर्जा देत आहेत. हे सगळे डोक्यावर पाणी गेल्यासारखे झाले आहे. तसेच, आता तर त्यांनी आणखी काही गावांवर आपला हक्क सांगितला आहे. म्हणजे बेळगाव, कारवार, निपाणी तर लांबच राहिले, त्यांना आता सोलापूर, कोल्हापूर, अक्कलकोट पाहीजे. महाराष्ट्राला कोण वाली आहे की नाही", असे म्हणत त्यांनी सवालही उपस्थित केला.

"केंद्रात, कर्नाटकात, महाराष्ट्रात भाजपाची सत्ता आहे. महाराष्ट्रात मिंदेंचे सरकार असले तरी ते भाजपाचेच आहेत. एकेकाळी आपल्या मिंदेंचा नेता बाळासाहेब होते आणि आता पंतप्रधान नरेंद्र मोदी झाले. पण कर्नाटक बोम्मई यांचा नेता मोदी असताना ते जोरात बोलतात, तर आमचा मुख्यमंत्री का नाही बोलत", असा सवाल उपस्थित करत उद्धव ठाकरेंनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला.

# सलाम वेंकी...क्यूंकी 'आनंद' कभी मरते नही




संवेदनशील अभिनेत्री रेवतीच्या दिग्दर्शनाखाली 'सलाम वेंकी' दर्जेदार बनणारच असावा... महिला दिग्दर्शिका पुरुषांच्या तुलनेत मानवी जाणिवा, संवेदनेबाबत खचितच जास्त संवेदनशील असाव्यात अशी शंका यावी. नंदिता दासचा 'मंटो 'किंवा दिपा मेहताचा 'वॉटर' किंवा गौरी शिंदेचा 'इंग्लिश विंग्लीश' किंवा अगदी मिरा नायरचा 'सलाम बॉम्बे' असावा, या दर्जेदार सिनेमांच्या रांगेत रेवतीला 'सलाम वेंकी'ने थेट नेलं आहे. 'सलाम वेंकी' का पहावा, यासाठी कित्येक भरपूर कारणं आहेत.

काजोलच्या आजपर्यंतच्या अभिनयाचा परमोच्च टप्पा तिनं इथं गाठला आहे. वेंकी साकारलेल्या विशाल जेठवाची वेदनादायक निरागस हतबलता, राहुल बोस, आहाना कुमरा, राजीव खंडेलवाल, कमल सदाना आणि प्रकाशराज आणि त्यांना साथ देणाऱ्या सहकलाकारांच्या संयत अभिनयासाठी की आमिर खानच्या लक्षात राहणाऱ्या गेस्ट अपियरन्ससाठी...बरीच कारणं आहेत, पण 'सलाम वेंकी' पहावा लागतो तो विशाल आणि काजोलसाठी आणि रेवतीच्या परिणामकारक दिग्दर्शनासाठी. गाणी, संवाद, कथा, पटकथा असं सगळंच परिणाम करणारं आहे. श्रीकांत मूर्तींच्या 'द लास्ट हुर्रह' वर आधारित सलाम वेंकी पडद्यावर येतो, वेंकीची वेदना दिग्दर्शिका रेवती उत्तमपणे समजू शकते, तिचा सलमानसोबतचा लव्ह आठवत असेल त्यात उठता बसता अँटीबायटीक्स औषधांमुळे मरणाच्या दाराशी किंवा नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीला रेवतीनं अंजली नावाचा सिनेमा केला होता. त्यात तीनचार वर्षांच्या गतीमंद मुलीची हतबल आई रेवती झाली होती, आपल्या मुलीसाठी भवतालसोबत संघर्ष करणारी रेवती आठवत असेल, हाच धागा तिनं आता काजोलच्या हाती दिला आहे. यावेळी इथं स्वतःला तिनं काजोलमध्ये पुरेपूर उतरवलं आहे. काजोलनंही तिचा अभिनयाचा हा दर्जेदार पैलू रेवतीच्याच ताकदीनं आत्मसात केला आहे.

जिंदगी लंबी नही बडी होनी चाहिए...ऋषीकेश मुखर्जींच्या 'आनंद'मधल्या राजेश खन्नाचं हे सूत्र या 'सलाम वेंकी'तही आहे, मात्र वेंकीच्या वेदनेचा अवकाश आनंदपेक्षा खूप मोठा आहे. ही वेदना वेंकीच्या ठरवलेल्या मृत्यूसोबत संपणार आहे, मात्र त्यानंतर त्याच्या जगण्याच्या वाट्याला न आलेला आणि आयुष्यात वापरला न गेल्याने मागे उरणारा अमर्याद आनंद अवयवदानातून तो जगासोबत वाटू इच्छितो, मात्र मरणोत्तर अवयवदानासाठी ब्रेन डेडची अट त्यासाठी अडचणीची ठरतेय, त्यासाठी कौटुंबिक, सामाजिक स्थिती, वैद्यकीय आणि न्यायव्यवस्थेतील त्रुटींचे समोर असलेले डोंगर पार करताना चित्रपटाचे समांतर जाणारे कथानक 'सलाम वेंकी'चा पडदा व्यापून उरते, 'सलाम वेंकी'मध्ये काजोलमधल्या आईचा तिच्याच अंतर्मनाशी होणारा संवाद त्यासाठीच महत्वाचा आहे.

# "मला 1 रुपया..." विजय पाटकरांनी सांगितली लक्ष्मीकांत बेर्डेंची आठवण

मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीत विनोदाचा बादशहा आणि मिमिक्री आर्टिस्ट म्हणून अभिनेते विजय पाटकर यांना ओळखले जाते. विजय पाटकर यांनी ८० च्या दशकात त्यांच्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांनी आतापर्यंत अभिनेता, निर्माता आणि दिग्दर्शक अशा तिन्ही क्षेत्रात काम केले आहे. सध्या ते प्रसिद्ध दिग्दर्शक रोहित शेट्टी याच्या सर्कस चित्रपटात काम करत आहे. यानिमित्ताने त्यांनी अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांची एक आठवण सांगितली आहे.



विजय पाटकर यांनी लक्ष्मीकांत बेर्डे यांच्याबरोबर अनेक चित्रपटात काम केले आहे. यातील अनेक चित्रपटात विजय पाटकर यांनी पोलीस पात्राची भूमिका साकारली आहे. सध्या ते सर्कस या चित्रपटाचे प्रमोशन करत आहेत. यानिमित्ताने नुकतंच त्यांनी एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. विजय पाटकर यांनी फार वर्षांपूर्वी एका विनोदी मालिकेचे दिग्दर्शन केले होते. या मालिकेत लक्ष्मीकांत बेर्डे हे प्रमुख भूमिकेत होते. त्या काळात विजय पाटकर यांना कामाचे पैसे देणे शक्य नव्हतं. एक दिवस विजय पाटकर हे पैशांबद्दल विचार करत बसलेले असताना लक्ष्मीकांत बेर्डे त्यांच्याकडे आले. विजय पाटकरांनी पैशाचा विषय काढण्यापूर्वीच लक्ष्मीकांत बेर्डे यांनी त्यांना चिंतामुक्त केले. मी तुझ्याकडे पैसे मागतोय का? असे त्यावेळी ते विजय पाटकरांना म्हणाले. तू जे काय देशील ते मी घेईन, जर तू मला १ रुपया दिलास तरीही मी यात काम करेन, असे त्यावेळी लक्ष्मीकांत बेर्डे विजय पाटकर यांना म्हणाले.

# एका चित्रपटामागे अक्षय घेतो 160 कोटी;

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारचं खर नाव राजीव हरी ओम भाटिया असे आहे. अक्षय सध्या 55 वर्षांचा असून त्याचा जन्म पंजाबच्या अमृतसर मधील एका पंजाबी कुटुंबामध्ये झाला होता. अक्षयचे शिक्षण मुंबईमध्ये झालं. 1991 साली अक्षयने सौगंध या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर लागोपाठ त्याचे अनेक सुपरहिट चित्रपट प्रदर्शित झाले. सध्या अक्षय कुमार बॉलिवूडमधील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्यांपैकी एक आहे. तो त्याच्या एका चित्रपटामागे 160 कोटी मानधन घेतो.



अक्षयचा जुहूतील आलिशान बंगला- अक्षयचे राहते घर मुंबईतील जुहू येथे आहे. हे संपूर्ण घर भव्य आणि आलिशान असून या घराची डिझाईन अक्षयची पत्नी ट्विंकल खन्नाने केली आहे. या घराव्यतिरिक्त मुंबईतील खार येथे 7.8 कोटी रुपयांची आलिशान अपार्टमेंट आहे. तसेच त्याचे मुंबईत आणखी चार फ्लॅट आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, अक्षयचा मॉरिशसमधील बीचजवळ एक भव्य बंगला आहे, जिथे तो अनेकदा आपल्या कुटुंबासह सुट्टी घालवतो. याशिवाय अक्षयचा गोव्यात एक व्हिला आहे, ज्याची किंमत सुमारे 5 कोटी रुपये आहे.

अक्षय कुमार कॅनडातील टोरंटो येथे डोंगर आणि घराचा मालक

अक्षय कुमारकडे कॅनडाचे नागरिकत्व आहे. कदाचित याच कारणासाठी त्याने कॅनडामध्येही गुंतवणूक केली असावी. अक्षयने मॅपल लीफमध्ये एक आलिशान बंगला आणि काही अपार्टमेंट्स आणि टोरंटोमध्ये संपूर्ण डोंगर खरेदी केला आहे.

2008 सुरु केले स्वतःचा प्रोडक्शन हाऊस- 2008 मध्ये अक्षयने वडिलांच्या नावाने 'हरिओम प्रॉडक्शन' सुरू केले, ज्याचे नाव आता 'केप ऑफ गुड फिल्म्स' असे ठेवण्यात आले आहे. सिंग इज किंग, हॉलिडे, एअरलिफ्ट, रुस्तम आणि पॅडमॅन यासारखे काही ब्लॉकबस्टर चित्रपट या प्रॉडक्शन हाऊसने तयार केले आहेत.



# पाकिस्तानच्या 'या' करिश्मा पुढे बॉलिवूड अभिनेत्रीसुद्धा आहेत फिक्या

***सध्या वारंवार सोशल मीडियावर अशाच एका तरुणीचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत असतात जी अगदी हुबेहुब करिश्मा कपूर सारखी दिसतेय. या तरुणीला पाहून करिश्मा कपूरचे चाहते सुद्धा हैराण झाले आहेत.***

बॉलिवूडमध्ये असे अनेक कलाकार आहेत ज्यांच्यामुळे त्यांच्यासारखेच दिसणारे लोग प्रसिद्ध होतात. काही लोक असे आहेत, जे हुबेहुबे चित्रपटातील कलाकारांसारखेच दिसतात. आता अलीकडे सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे अशा अनेक लोकांना चांगलीच प्रसिद्धी मिळत आहे. सध्या वारंवार सोशल मीडियावर अशाच एका तरूणीचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत असतात जी अगदी हुबेहुब करिश्मा कपूर सारखी दिसतेय. या तरूणीला पाहून करिश्मा कपूरचे चाहते सुद्धा हैराण झाले आहेत.

करिश्मा कपूर सारखी हूबेहूब दिसणाऱ्या या तरूणीचे नाव हिना खान असून हि तरूणी पाकिस्तानची आहे. तसेच हि सोशल मीडियावर खूप ॲक्टिव असते. तिने शेअर केलेले फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर या तरूणीचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत असतात. तसेच हिनाचे अनेक व्हिडीओ करिश्मा कपूरच्या चित्रपटातील गाण्यांवर आणि डायलॉगवर असतात.

हिना खानत्या लूकबाबत सांगायला गेलं तर हिनाचे डोळे आणि केसांची रचना सुद्धा अगदी करिश्मा कपूर सारखीच आहे.याशिवाय तिचा चेहरा सुद्धा करिश्मा कपूर सारखाच आहे. तसेच हिनाचे तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर अनेक फॉलोवर्स आहेत.तर करिश्मा कपूरचेही सोशल मीडियावर लाखो चाहते आहेत. करिश्मा कपूरला ९० च्या दशकातील सुपरहिट आणि सुंदर अभिनेत्रींमधील एक मानले जाते.

## स्मृतीचा सुपर ओव्हरमध्ये धडाका!

# भारताचा थरारक विजय!

**। चट्टोग्राम ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-20 मालिकेतील दुसऱ्या सामन्यात सुपर ओव्हर मध्ये रोमांचक सामना जिंकला. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने 1 गडी बाद 187 धावा केल्या. स्मृती मंधानाचे अर्धशतक आणि ऋचा घोषच्या झंझावाती फलंदाजीच्या जोरावर भारताने 5 बाद 187 धावा केल्या. सुपर ओव्हरमध्ये 21 धावा करून भारताने ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाचा विजय रथ रोखला.

या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. कांगारू संघाने दमदार सुरुवात केली. एलिसा हिलीने आक्रमक भूमिका घेत रेणुका सिंगवर तीन चौकार आणि अंजली सरवानीवर दोन चौकार लगावले. एलिसाने मात्र चौथ्या षटकात दीप्तीच्या चेंडूवर देविका वैद्यला बॅकवर्ड पॉइंटवर झेलबाद केले. यानंतर बेथ मुनी (नाबाद 82) आणि ताहलिया मॅकग्रा (नाबाद 70) यांनी दुसऱ्या विकेटसाठी 158 धावांची भागीदारी करत ऑस्ट्रेलियाने 20 षटकांत 1 गडी गमावून 188 धावा केल्या.ऑस्ट्रेलियाने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियासाठी स्मृती मानधना आणि शेफाली वर्मा सलामीला आल्या. शेफालीने शानदार खेळी केली. त्याने 23 चेंडूंचा सामना करत 34 धावा केल्या. जेमिमा रॉड्रिग्ज अवघ्या 4 धावा करून बाद झाली. कर्णधार हरमनप्रीत कौरने 21 धावांचे योगदान दिले. त्याने 22 चेंडूंचा सामना करत 2 चौकार आणि 1 षटकार लगावला. स्मृती मानधनाने 49 चेंडूत 79 धावा केल्या. त्याने 9 चौकार आणि 4 षटकार मारले. दीप्ती शर्मा 2 धावा करून बाद झाली. शेवटी ऋचा घोष आणि देविका वैद्य यांच्यात सामना बरोबरीत सुटला. देविकाने 5 चेंडूंचा सामना करत नाबाद 11 धावा केल्या. त्याने 2 चौकार मारले.



### स्मृतीचा सुपर ओव्हरमध्ये धडाका

**रिचा घोष आणि स्मृती मानधना यांना सुपर ओव्हरमध्ये फलंदाजीची जबाबदारी देण्यात आली होती. रिचाने पहिल्या चेंडूवर जबरदस्त षटकार ठोकला पण पुढच्याच चेंडूवर ती बाद झाली. कर्णधार हरमनप्रीत कौरने पुढच्या चेंडूवर 1 धाव घेतली. मंधानाने चौथ्या चेंडूवर चौकार मारला आणि पुढच्या चेंडूवर षटकार मारून सर्वांना मंत्रमुग्ध केले. सीमारेषा ओलांडण्यासाठी त्याने शेवटचा चेंडूही मारला पण तो रोखला गेला. येथे 3 धावांसह भारताने 21 धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचा संघ 1 गडी गमावून 16 धावाच करू शकला. अशाप्रकारे भारतीय संघाने सुपर ओव्हरमध्ये थरारक विजयाची नोंदवला.**

## कर्णधाराच्या एका चुकीमुळे इंग्लंडचा खेळ खल्लास...

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

फुटबॉल विश्वचषक स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीतील शेवटच्या सामन्यामध्ये गतविजेत्या फ्रान्सने इंग्लंडवर २-१ च्या फरकाने विजय मिळवत उपांत्य सामन्यातील स्थान निश्चित केलं आहे. हे दोन्ही बलाढ्य संघ तब्बल ४० वर्षांच्या कालावधीनंतर विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आमनेसामने आले होते. या सामन्यामध्ये अगदी ७८ व्या मिनिटाला फ्रान्सने केलेला गोल आणि इंग्लंडचा कर्णधार हॅरी केनने ऐनवेळी चुकवलेली पेनल्टीच्या (HARRY KANE MISS PENALTY) संधीमुळे इंग्लंडचा स्पर्धेतून गाशा कुंडाळावा लागला. सामन्यातील १८ व्या मिनिटालाच ऑरेलियन टिचोयुमेनीने फ्रान्सला १-० ची आघाडी मिळवून दिली. त्यानंतर पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांना गोल करता आला नाही. सामन्याच्या दुसऱ्या हाफमध्ये अगदी नवव्या मिनिटाला इंग्लंडने १-१ ची बरोबरी केली. कर्णधार हॅरी केनने पेनल्टीचं रुपांतर गोलमध्ये करत संघाचं आव्हान कायम ठेवलं.



## ऑस्ट्रेलियाने विंडीजला चारली धूळ!

### मात्र टीम इंडियाचे वाढले टेन्शन

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



ICC वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप 2023च्या अंतिम फेरीची शर्यत मनोरंजक बनली आहे. ऑस्ट्रेलियाने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत वेस्ट इंडिजचा व्हाईटवॉश केला, आता कांगारूंचे वर्चस्व आहे. संघाने पुढचे काही सामने जिंकले तरी फायनलमध्येही प्रवेश करेल. त्यामुळे टीम इंडियाचे तणाव वाढले आहे.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या 2021-23 सीझनच्या पॉइंट टेबलमध्ये सध्या ऑस्ट्रेलियाचा संघ 75 टक्के विजय गुणांसह अव्वल स्थानावर आहे, तर दक्षिण आफ्रिकेचा संघ 60 टक्के विजय गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याच वेळी, श्रीलंका तिसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने 53.33 विजयाची टक्केवारी कायम ठेवली आहे. भारताचा संघ 52.08 विजयाच्या टक्केवारीसह चौथ्या क्रमांकावर आहे.

पाचव्या स्थानी पाकिस्तान तर सहाव्या स्थानी आता इंग्लंड आहे, कारण वेस्ट इंडिज ऑस्ट्रेलियाकडून 0-2 ने मालिका गमावल्यानंतर सहाव्या स्थानावरून सातव्या स्थानावर घसरला आहे. सध्या न्यूझीलंड संघ आठव्या स्थानावर आहे, तर बांगलादेश संघ शेवटच्या स्थानावर आहे.

सध्या चार संघांमध्ये अंतिम फेरीची शर्यत सुरू आहे. दक्षिण आफ्रिका विरुद्ध ऑस्ट्रेलिया 3 सामन्यांची मालिका आणि त्यानंतर भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात 4 सामन्यांची कसोटी मालिका होणार आहे. कोणता संघ अंतिम फेरीत प्रवेश करेल हे त्यावेळेस ठरवेल. तथापि जर ऑस्ट्रेलियन संघाने दक्षिण आफ्रिकेला 3-0 किंवा 2-0 किंवा 2-1 ने पराभूत केले तर ते निश्चितपणे अंतिम फेरीत पोहोचतील. त्याचबरोबर टीम इंडियाला आधी बांगलादेशविरुद्धच्या दोन सामन्यांत आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चार सामन्यांच्या मालिकेत त्यांचा पराभव करावा लागेल. असे झाले तरी, संघाची विजयाची टक्केवारी 70 पेक्षा कमी असेल. परंतु अशा परिस्थितीत भारत विजयाच्या

## मोरोक्कोच्या खेळाडूनं आईसोबत साजरा केला विजयाचा आनंद

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

**फिफा विश्वचषक 2022 मध्ये, मोरोक्कोने पोर्तुगालविरुद्ध दणदणीत विजय मिळवून इतिहास रचला. मोरोक्कोने पोर्तुगालचा 1-0 असा पराभव करत स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले. मोरोक्कनच्या खेळाडूंसाठी हा विजय खूप मोठा होता. त्यामुळेच सामना संपल्यानंतर त्यांनी हा विजय मोठ्या जल्लोषात साजरा केला.**



दरम्यान मोरोक्कोसाठी अटॅकिंग मिडफिल्डर म्हणून खेळणारा सोफीयन बूफलने हा विजय तिच्या आईसोबत साजरा केला. या सेलिब्रेशनचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

या व्हिडिओत सामना जिंकल्याच्या आनंदात सामना संपल्यानंतर बूफलआणि त्याची आई मैदानावर नाचताना दिसत आहेत. बूफल आणि त्याची आई एकत्र नाचतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून काही तासांतच तो लाखो लोकांनी पाहिला आहे. लोक हा व्हिडिओ आणि फोटो पाहून भावनिक कमेंट करत आहेत.

मोरोक्कोने इतिहास रचला

मोरोक्कोने पोर्तुगालला पराभूत करून इतिहास रचला असून विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा पहिला आफ्रिकन संघ ठरला आहे. या सामन्याच्या पूर्वार्धात कोणत्याही संघाला गोल करता आला नाही, मात्र उत्तरार्धात मोरोक्कोने गोल करत सामन्यावर आपली पकड मजबूत केली.

मोरोक्कोने संपूर्ण स्पर्धेत डिप डिफेंस खेळ खेळला आगे आणि या सामन्यातही त्यांची डिफेंसची ताकद दिसून आली. या पराभवामुळे ख्रिस्तियानो रोनाल्डोचे विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न पुन्हा एकदा भंगले आहे. आता उपांत्य फेरीत त्यांचा सामना फ्रान्सशी होणार आहे.